# : निवेदन :

अनेक भाविकांना आपल्या सद्भक्ती मंदिराकरिता काहीतरी आर्थिक सेवा करण्याची इच्छा असते. जे जवळपास राहतात ते मंदिरात प्रत्यक्ष येऊन रोख रक्कम किंवा चेक देतात. पण आपले बरेचसे सद्भक्त दूरवर राहतात. काही मुंबई बाहेर, काही महाराष्ट्रा बाहेर तर काही परदेशात आहेत.

ह्या सर्वांना सोईचे व्हावे म्हणून आता Net Banking तर्फे सेवाशुल्क स्वीकारायला सुरूवात केली आहे. अशा प्रकारचा व्यवहार करण्याकरिता लागणारा तपशील खालील प्रमाणे आहे :-

| | | |
|---|---|---|
| **Name of the account** | **:** | SADBHAKTI PRASARAK MANDALI |
| **Account No** | **:** | 00610010000130 |
| **Bank Name** | **:** | NKGSB Co-Op Bank Ltd. |
| **Branch** | **:** | Jogeshwari (East), Mumbai - 400 060. |
| **IFSC Code No.** | **:** | NKGS0000006 |

उपरोक्त विषयासंबंधी काही अधिक माहिती हवी असल्यास खालील व्यक्तींशी संपर्क साधावा :-

**१. श्री. विवेक ताम्हाणे भ्रमणध्वनी : ९८२०३५०८६७**
**२. श्री. नागानंद निळेश्वर भ्रमणध्वनी : ९८२१२७०७७२**
**३. श्री. अरूण विजयकर भ्रमणध्वनी : ९२२३२२२२४५**



**।। श्री सद्गुरु प्रसन्न।।**



## - संपादकाचे बोल -

**(वर्ष ९२) ऑक्टोबर ते डिसेंबर २०२० (संयुक्तांक ४ ते ६)**

मार्च ते सप्टेंबर पर्यंत झालेल्या उत्सवात एकादशणी व इतर वेळी म्हणण्यात येणारी पदे :-

श्री रामेश्वर मंदिराचा वर्धापन दिन व श्री दत्तपादुका स्थापना दिन व सद्गुरु श्री दादाभाईंचा पुण्यतिथी दिन, लॉकडाऊन पूर्वी झालेला असल्यामुळे त्याचा गोषवारा देत आहे.

सोमवार दिनांक २ मार्च २०२० (फाल्गुन शुद्ध सप्तमी) रोजी श्री रघुनाथ स्वामी पादुका स्थापन दिन होता. ११.३० वाजता एकादशणी झाली. त्यावेळी १) माझी देवपूजा, देवपूजा २) मनोभाव जाणुनि माझा ३) संत चरणतीर्थी करीन आंघोळी ४) संतांच्या दारीचा होईन उंबर ५) आले हो रघुनाथ मंदिरी आले ही प्रार्थना शेवटी म्हणण्यात आली.

गुरुवार दि. ५ मार्च (फाल्गुन शुद्ध दशमी) रोजी श्री रामेश्वर मंदिराचा वाढदिवस व श्री दत्त सुवर्ण पादुका स्थापना दिन होता. त्यावेळी ११.३० वाजता एकादशणी झाली. त्यावेळी १) माझी देवपूजा, देवपूजा २) मनोभाव जाणुनि माझा । सगुण रुप धरिले ओजा । ३) दत्त आठविता सद्गदित कंठी । उभा जगजेठी मागे पुढे ४) दत्तासि गाईन, दत्तासि पाहीन । वाहीन हे मन दत्तापायी ।। ५) तुम्ही या प्रभुला भजुनि पहा रे । तुम्ही या गुरुला भजुनि पहा रे ।। ६) श्री भाईंची साद ऐकुनि मंगेश इथे आले ।। ७) शांत किती ही सद्गुरु मूर्ति । पाहतां मावळे द्वैतवृत्ति ।। ८) मी बाळ तूं जननी सद्गुरुमाते ९) बोल बोल बोल दत्ता बोल एक बोल रे । डोळे तुझ्या वृत्तिसुख देव स्वरुपी डोळ रे ।। १०) बोलिलासि तू शंकरा मला । ज्ञान हे मिळे भाविका जना ।। आणि शेवटी ११) दत्त गुरुराज, दत्त महाराज । दत्त योगीराज स्मृति गायी ही प्रार्थना म्हणण्यात आली व त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण झाले.

सर्व सद्भक्तांना महाप्रसादाचा लाभ मिळाला. सायंकाळी ५.३० वाजता जगद्राध्य त्रिमूर्तीच्या पादुकांची स्थापना या विषयावरील प्रवचनाचे वाचन झाले. रात्रौ ८.३० वाजता पालखी मिरवणूक संपन्न झाली.

**परमप्रिय सद्गुरु श्री दादाभाईंचा पुण्यतिथी दिन -**

मंगळवार १० मार्च २०२० (फाल्गुन वद्य प्रतिपदा) परमप्रिय सद्गुरु श्री दादाभाईंची पुण्यतिथी होती. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना केली गेली. ११.३० वाजता गुरुपादुकांस एकादशणी झाली.

त्यावेळी १) माझी देवपूजा, देवपूजा २) मनोभाव जाणुनि माझा । सगुण रुप धरिले ओजा । ३) अधिर नयन झाले हे पहाया । रुप गुरुराया दिव्य तुझे ४) यारे



## महत्वाच्या सूचना

ह्या अंकातील आणि ह्या आधीच्या अंकातील उल्लेख केलेले उत्सव - महोत्सव आपल्या सद्भक्ती मंदिरातील प्रथेनुसार देण्यात आलेले आहेत. परंतु विद्यमान सरकारी आदेश आणि त्याप्रमाणे पाळण्यात येणारा लॉक डाऊन ह्यामुळे एप्रिल आणि मे महिन्यातील उत्सव थोडक्यात आणि अल्पावधीत फक्त गुरुजींच्या हस्ते आणि एक किंवा दोन मदतनीस भक्तांच्या उपस्थितीत साजरे करावे लागले होते.

तसेच पुढील उत्सव सालाबादप्रमाणे साजरे केले जाणार की वर उल्लेख केल्याप्रमाणे थोडक्यात ओटोपते घ्यावे लागणार हे त्या त्या वेळेस जाहीर केल्या जाणाऱ्या सरकारी आदेशांवर अवलंबून असेल. सद्य परिस्थितीत सरकारी आदेशानुसार कोणताही उत्सव अत्यंत छोट्या प्रमाणात, म्हणजे केवळ गुरुजी आणि एक किंवा दोन मदतनीस भक्तांच्या उपस्थितीत साजरा करावा लागणार आहे. पुढील सूचना येईपर्यंत तरी सर्व भक्तांना विनंती आहे की ह्या पुढील उत्सवांच्या तारखांच्या एक किंवा दोन दिवस आधी त्यांनी खालीलपैकी एखाद्या भक्ताशी संपर्क करून नंतरच सद्भक्ती मंदिरात दर्शनाला यावे, जेणेकरून सद्भक्तांची निराशा आणि गैरसोय होणार नाही.

१. श्री. नागानंद निळेश्वर - दू. भ्र. क्र. ९८२१२७०७७२
२. श्री. समीर रायकर - दू. भ्र. क्र. ९८२००८४०३०
३. श्री. रोहन दळवी - दू. भ्र. क्र. ९८६७४९४७४७
४. श्री. अरूण विजयकर - दू. भ्र. क्र. ९२२३२२२२४५

**टीप :** उत्सवाचे वेळी सध्या आपले माननीय गुरुजी पहाटे सूर्योदयसमयी गाभाऱ्यात, आतल्या आत श्री दत्तगुरुंची नित्यपूजा करतात आणि सर्व पादुकांना अभिषेक करतात. भक्तमंडळी आपापल्या घरी नामस्मरण, वाचन करतात. सरकारी आदेशानुसार भक्तांना दर्शनाकरिता मंदिरात सध्या प्रवेश नाही.

दररोज श्री दत्तगुरुंची नित्यपूजा माननीय गुरुजी पहाटे सूर्योदय समयी करतात. सरकारी नियमाचे पालन करूनच इतर सेवा शक्य तितक्या केल्या जातात.

झाले आणि मुंबई विद्यापीठातून पुढील शिक्षण झाले. ते पुढे भांडुप येथील सुप्रसिद्ध GKW ह्या कंपनीत इंजिनिअर म्हणून काम करीत असत. अतिशय खेळकर स्वभाव, मनमिळाऊ आणि सेवाभावी वृत्ती, सतत इतरांना मदतीचा हात पुढे करणारे असे तात्या आपल्याला सोडून गेल्यामुळे त्यांच्या स्नेही परिवारास फार हळहळ वाटणे साहजिकच आहे. गेले काही महिने ते कर्करोगाशी झुंज देत होते.

त्यांचे आजोबा वै. सावळाराम कामत ह्यांना प.पु. श्री भाईंचा आणि वडील वै. शंकर कामत ह्यांना प.पु. श्री दादाभाईंचा दीर्घ काल सहवास लाभला आणि मार्गदर्शन लाभले. श्री. तात्या सद्भक्ती मंदिरतातील प्रत्येक महत्वाच्या कार्यक्रमास हजेरी लावीत असत. शरीर साथ देत नसतानाही.

त्यांच्या स्मृतीस प्रणाम!

✸ ✸ ✸

श्रीमती नीना मनोहर दळवी ह्यांचे दि. २ नोव्हेंबर २०२० रोजी वृद्धपकाळाने निर्वाण झाले.

सात्विक, सोज्वळ अशा वनिता सामंत ह्या ८ ऑक्टोबर १९६२ रोजी श्री. मनोहर दळवी ह्यांच्याशी विवाहबद्ध होऊन टाकी महाराजांच्या परिवारात सामील झाल्या. परमेश्वरावर नितांत श्रद्धा असल्यामुळे त्या एक कर्तबार महिला आणि उत्तम गृहिणी म्हणून परिचित होत्या. प्रथम CTO मध्ये एक कर्तव्यनिष्ठ अधिकारी म्हणून आणि पुढे स्वत:च्या हिमतीवर उभारलेल्या उद्योगात एक कल्पक, कर्तबगार आणि यशस्वी उद्योजिका म्हणून त्या सर्वश्रुत होत्या.

अनेक क्षेत्रात त्यांचे कौशल्य चकित करणारे होते. शास्त्रीय संगीताची त्यांना उत्तम जाण होती आणि विशेष म्हणजे त्या एक उत्कृष्ट जलतरणपटू होत्या. जिद्द आणि त्या जोडीला प्रचंड मेहेनत ह्याच्या जोरावर त्यांनी स्वबळावर स्वत:चे घर बांधून आपल्या परिवाराला कायमचे छप्पर मिळवून दिले.

टाकी महाराजांच्या परिवारातील एक अनोखी, कर्तृत्ववान स्नुषा हरपली. त्यांची पुढील यात्रा प्रशांत, आनंदमयी होणार हे निश्चितच.

*टीप : ह्या खेपेचा हा अंक लॉकडाऊन आणि काही तांत्रिक अडचणींमुळे नोव्हेंबर महिन्याच्या मध्यावर प्रकाशित करण्यात आला.*



यारे सद्‌गुरुच्या घरी जाऊ । प्रेम भक्तीचा सोहळा डोळा पाहू ।। ५) गुरुचे भजन, हेंचि माझे ध्यान । तेंचि पूर्ण ज्ञान जाण माझे ६) दादाभाई नाम तुमचे अति सुखदायी । निरंतर जिव्हे माझ्या घेई घेई ७) तो मज आठवतो गुरुराजा । प्राण विसावा माझा ८) सद्‌गुरुसारिखा असतां पाठीराखा । इतरांचा लेखा कोण करी ९) गुरुजी तोरे पैयॉ पर सीस धरूं १०) या गुरुसि काय बां द्यावे । त्याचे कैसे मी उतराई व्हावे ११) भाव सुमने भक्तीची मी गुरुवरांना वाहते । नेत्रज्योति लावुनिया आरती ओवाळीते । शेवटी प्रार्थना १२) साकार मूर्तिचे दर्शनाची चाड । नसे ते आवड कैवल्याची म्हणण्यात आली. त्यानंतर ब्राह्मण सुवासिन संतर्पण झाले व अनेक सद्भक्तांना महाप्रसादाचा लाभ मिळाला. सायंकाळी ५.३० वाजता गुरुवर्यांचे वैकुंठारोहण वाचन झाले व त्यावेळी १) लागे लागे लागे मना गुरुपायी। २) भगवद्‌चरणी तल्लीन होऊनि देहावरती येऊ नको हा मधुर फटका ३) ह्याचे पाय विसरावे कैसे आता । ज्याच्या नावे पळाली भवव्यथा ।। ४) अमुच्या कल्याणा कारणे झटती । नित्य सुखराशी नारायणा ५) जन्मोजन्मी ऐसा सद्‌गुरु मिळावा । भक्त मेळा ऐसा सदा असावा ।। ६) घाली पंखाखाली सद्‌गुरु माऊली । करोनि साउली कृपेची गे ही प्रार्थना म्हणण्यात आली. त्यानंतर सद्‌गुरु श्री दादाभाईंच्या शेवटच्या प्रवचनाची ध्वनिमुद्रण ऐकून कान तृप्त झाले व त्या दिवशीचा सोहळा संपन्न झाला व त्यानंतर लॉकडाऊनमुळे मंदिराचे दर्शनच झाले नाही, ही खूप खंत वाटते. पण लवकरच दर्शन मिळेल, ही सद्‌गुरुचरणी प्रार्थना करू या.

लॉकडाऊनच्या काळात थोडक्यात जे उत्सव झाले त्यावेळची पदे :-

गुरुवार दि. २ एप्रिल २०२० रोजी श्री रामनवमी होती. जन्मापूर्वी १) रामा तूं येई मम हृदया वास करी २) ये रे ये रे माझ्या रामा ।। ही पदे म्हणण्यात आली. दुपारी १२ वाजता श्री रामजन्मोत्सव साजरा झाला. त्यापूर्वी १) राम दर्शनासि चला लाभ हा भला ।। हे पद झाले. जन्मानंतर १) बाळा जो जो रे, कुलभूषणा दशरथ नंदना २) विश्व डोळा रामणि आत्मा हरि हा पाळणा म्हणण्यात आला. त्यानंतर १) छत्र सिंहासनी अयोध्येचा राजा । नांदतसे माझा रामचंद्र २) ज्याचे वंशी कुळधर्म राम सेवा । त्याचे वंशी मज जन्म दे गा देवा ।। ३) टाकियला

निजभार रामा ही प्रार्थना म्हणण्यात आली.

बुधवार दि. २९ एप्रिल २०२० (वैशाख शुद्ध षष्ठी) रोजी श्री वामन पंडितांची पुण्यतिथी होती. ११.३० वाजता एकादशणी करण्यात आली. त्यावेळी १) माझी देवपूजा, देवपूजा २) मनोभाव जाणुनि माझा । सगुण रुप धरिले ओजा ३) अनेक जन्मे साधन करिता । आतळेना मुक्ति जे । संतसंगे हरिसि भजता दासा लाभे ते सहजे ४) गोविंदा गोपाळा मज तारी । भवनदी भयंकर वाटे भारी ।। ५) आम्ही जाणो हरिचे पाय । नेणो अन्य उपाय ।। ६) आनंद मनी हा झाला । पाहता श्री वामन पदकमळाला ।। ७) तारि मला जगदंब त्व चरणाविण देवी नसे मज अन्य जगी अवलंब ८) गोविंद घ्या बाई गोपाळु घ्या गे । दामोदर घ्या बाई माधव घ्या गे ।। ९) श्री वामन जय वामन म्हणू आम्ही आता । १०) ध्यातां सुतळामिनी । जाती दिन यामिनी ।। घडी एक नरि आठवा रामा ।। ११) सद्‌गुरुराया चुकवी जन्ममरण । जन्म हा न लगे वंदिता तव चरण ।। १२) तुमच्या चरणां मागो हेंचि दान । प्रसन्न होवो नि द्यावे आम्हां ।। ही प्रार्थना म्हणण्यात आली.

गुरुवार दि. २१.५.२०२० (वैशाख शुद्ध चतुर्दशी)ला गुरुवर्य श्री बाबांची एकादशणी पुण्यतिथी होती. या वर्षी गाभाऱ्यातच एकादशणी करण्यात आली. त्यावेळी १) माझी देवपूजा, देवपूजा २) मनोभाव जाणुनि माझा । सगुण रुप धरिले ओजा । पाहुणा सद्‌गुरुराजा आला वो माये ।। ३) म्यां शंकर पुजिला, भावे पुजिला ४) शंकर भोळा हो भोळा ५) येई येई गुरुराज आज । झडकरि मज तारी ।। ६) हरि तुझी भक्ति मला देई ७) धाव दयाघन, धांव कृपाघन । धाव समर्था विश्वपते ।। ८) टाकी कुळश्रेष्ठ शंकरा । घ्या पदरी पामरा ।। आणि शेवटी ९) करी ऐसे सद्‌गुरु देवराया ।। ही प्रार्थना म्हणण्यांत आली.

रविवार दि. ५ जुलै २०२० रोजी गुरुपौर्णिमा होती. सकाळी गाभाऱ्यातच एकादशणी करण्यात आली. त्यावेळी १) माझी देवपूजा, देवपूजा २) मनोभाव जाणुनि माझा । सगुण रुप धरिले ओजा । ३) शांत किती ही सद्‌गुरुमूर्ति । पाहता मावळे द्वैतवृत्ति ।। ४) आली रे आली । आली गुरुमाऊली ५) गुरुचे भजन, हेंचि माझे ध्यान । तेंचि पूर्ण ज्ञान जाण माझे ।। ६) मागू काय गुरुवरां । तुज दयेच्या



असलेल्या नि:स्वार्थी प्रेम आणि श्रद्धेचे एक दैदिप्यमान पर्व आता समाप्त झाले.

आम्ही भक्तगण श्रीधरपंतांच्या स्मृतीला अभिवादन करून श्री भाई आणि श्री दादाभाईंच्या प्रमाणेच त्यांचेही आशीर्वाद आम्हाला सदोदित लाभोत अशी प्रार्थना करीत आहोत.

ओम शांती शांती शांती!

✹✹✹

सौ. अनुराधा (मंगल) यशवंत टाकी ह्यांना दि. ३० सप्टेंबर २०२० रोजी दीर्घ कालीन आजारानंतर देवाज्ञा झाली. सौ. अनुराधा ह्या सद्‌गुरु श्री दादाभाईंचे प्रपौत्र श्री. यशवंतराव टाकी ह्यांच्या पत्नी आणि वै. चंद्रकांत टाकी (प.पू. दादाभाई ज्यांचे काका होते) आणि वै. सौ. चंपूताई ह्यांच्या स्नुषा.

सौ. अनुराधा ह्यांच्या मृत्यूमुळे टाकी परिवारात शोककळा पसरली आहे.

स्वत: सद्‌गुरु श्री दादाभाई श्री यशवंतराव आणि त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन करतील अशी खात्री आहे.

सौ. अनुराधा श्री भाई-दादाभाईंच्या चरणी विलीन झाल्या.

✹✹✹

श्री. धुंडिराज वामनराव भोईर ह्यांचे दि. १९/१०/२०२० रोजी दु:खद निधन झाले. अनेक मोठ्या उद्योगसमूहांचे ते तांत्रिक सल्लागार होते. त्यांचा हसरा चेहरा व खेळकर वृत्ती ह्यामुळे ते सर्वत्र लोकप्रिय झाले होते. अनेक कौटुंबिक आपत्तींना ते हसतमुखाने सामोरे गेले. बाळमंडळातील त्यांची नित्य हजेरी सर्वांच्या परिचयाची झाली होती आणि बालमंडळाच्या लळीतातील त्यांच्या भूमिका कायमच्या लक्षात राहणाऱ्या ठरल्या. श्रींच्याचरणी त्यांना चिरविश्रांती मिळो हीच आमची प्रार्थना!

✹✹✹

श्री. व्यंकटेश (तात्या) शंकर कामत ह्यांनी रविवार दि. १ नोव्हेंबर २०२० रोजी देह ठेवला.

त्यांचा जन्म ३ जुलै १९४७ रोजी सरस्वती बाग, जोगेश्वरी येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण पार्ले टिळक विद्यालय आणि अरविंद गंडभीर विद्यालय येथे

बेचैन होत असत. ते रोज किमान १०८ सूर्यनमस्कार घालीत असत. स्वत: सोबत इतर तरुण मुलांना घेऊन यायचे आणि त्यांना सूर्यनमस्कार घालायला लावायचे. सूर्यनमस्कार, जोर, दंड, बैठका आणि सात्विक आहार ह्यावर त्यांचा भार असल्यामुळे त्यांच्या तालमीत तयार झालेल्या असंख्य तरुणांना उत्तम आरोग्य लाभले, असे ते तरुण, (आता मध्यमवयीन किंवा वयस्क), आनंदाने सांगतात.

१९९० साली त्यांनी सेवानिवृत्ती घेतली आणि त्यानंतर स्वत:ला सद्भक्ती मंदिराच्या कार्याला पूर्णपणे वाहून घेतले. सेवानिवृत्ती पूर्वी आणि शेवट पर्यंत ते घरच्या घरी रोज सकाळी घरच्या देवांना "उठी उठी शंकरा" म्हणून उठवीत असत आणि शिवाय "गिरिजापती राया, करी तू दया", "हरी तुझी भक्ती मला देई, प्रभो तुझी प्रीती मला देई", "देवा नको विषयवासना" इत्यादी पदे म्हणीत असत. रात्री ते देवांना झोपवीत असत. त्यावेळी "निज निज शंकरा, मनोहरा" आणि "आड केले देवद्वार" ही पदे म्हणत असत. हे संस्कार त्यांच्या मुलामुलींवर झाल्यामुळे ते देखील ही प्रथा त्यांच्या त्यांच्या घरी अजून पाळताहेत. ब्रह्मा-विष्णु-महेशा ह्या महामंत्राचा जप ही मुले सतत करीत असतात.

श्रीधरपंतांच्या नि:स्वार्थीपणा, प्रेमळपणा, इतरांना काहीतरी देण्याची वृत्ती, साधी, सरळ राहणी आणि शिस्त, ह्या गुणांचा आम्हाला आयुष्यात खूप फायदा झाला. असे त्यांच्या मुली आणि मुलगा अत्यंत कृतज्ञतेने सांगतात.

श्रीधरपंतांच्या भक्तीमार्गात आणि त्यांच्या आध्यात्मिक प्रगतीत त्यांच्या धर्मपत्नी वै. मायादेवी ह्यांचा विशेष सहभाग होता. शिफ्टची नोकरी असूनही सद्भक्ती मंदिरातील नित्यसेवा आणि घरच्या देवांची सेवा कधी चुकली नाही. त्याचे कारण म्हणजे वै. मायादेवी ह्यांचे अमोल सहकार्य. मुलामुलींवर उत्तम संस्कार झाले असे वर नमूद केलेच आहे. हे संस्कार देण्यात वै. मायादेवींचा देखील मोठा वाटा होता

सेवानिवृत्तीनंतर श्रीधरपंत सद्भक्ती मंदिरातील प्रत:स्मरणापासून शेजास्तवनापर्यंत जवळ जवळ सर्वच नित्यसेवा नियमितपणे करीत असत. स्मरणशक्ती उत्तम लाभल्यामुळे शेवट पर्यंत सगळी भजने त्यांना तोंडपाठ होती आणि भजनात रमून जाणे त्यांना अत्यंत प्रिय होते.

श्रीधरपंतांच्या वैकुंठ गमनामुळे सद्भक्ती मंदिराच्या इतिहासातील गुरुचरणी



सागरा ।। ७) मग हृदय गगन रवि उघड करील त्या । गुरुला मी नमी ।। ८) तो मज आठवतो गुरुराजा । प्राण विसावा माझा ।। ९) माझा सद्गुरु ब्रम्हानंद । पहा आला रे बाळमुकुंद ।। १०) भवतारक ह्या तुझ्या पादुका वंदीन मी माथा । करावी कृपा गुरुनाथा ।। ही प्रार्थना म्हणण्यात आली.

मंगळवार दि. ७ जुलै २०२०ला (आषाढ वद्य द्वितीया) परमप्रिय सद्गुरु श्री दादाभाईंची जयंती होती. सकाळी १० वाजता जन्मोत्सव संपन्न झाला. त्यापूर्वी १) अधिर नयन झाले हे पहाया । रुपगुरुराया दिव्य तुझे ।। हे पद व नामघोष. जन्माचे वेळी १) बाळा जो जो रे कुलभूषणा । रामचंद्र नंदना ।। २) विश्व डोळारा माजि आत्मा हरि ।। हा पाळणा म्हणण्यात आला. ३) घास घे रे तान्ह्या बाळा । गोविंदा गोपाळा ।। ४) माझा सद्गुरु ब्रम्हानंद । पहा आला रे बालमुकुंद ।। ५) नको मनी विषयांचा अंकुर । राहोत ते दूर पंचवैरी ही प्रार्थना म्हणण्यात आली. सकाळी गुरुपादुकांस एकादशणी करण्यात आली. त्यावेळी १) माझी देवपूजा, देवपूजा २) मनोभाव जाणुनि माझा । सगुण रुप धरिले ओजा । ३) संत चरण तीर्थी करीन आंघोळी । ऐसे वनमाळी करी मज ४) तू माझी माऊली मी वो तुझा तान्हा । पाजी प्रेमपान्हा पांडुरंगे ।। ५) तुजहुनि कोणी नसे मज थोर गुरुजी ६) अनंत जन्मीचे पुण्य फळां आले । पाय हे न्यहाळे सद्गुरुचे ।। ही प्रार्थना म्हणण्यात आली.

शुक्रवार १० जुलै २०२० रोजी (आषाढ वद्यपंचमी) आद्य सद्गुरु श्री नारायण महाराज पुण्यतिथी व जयंती होती. सकाळी एकादशणी झाली. १) माझी देवपूजा, देवपूजा २) मनोभाव जाणुनि माझा । सगुण रुप धरिले ओजा । ३) संताचिया पुढे होईन खेळता ४) संतचरण तीर्थी करीन आंघोळी । ऐसे वनमाळी करीन आंघोळी । ५) नारायण नाम सार जपत जा सदा रे ।। ६) हर हर हे काय नरा । कशी तव मती गेली ।। ७) बोला नारायण बोला । वंदा गुरुमाऊलीला ।। ८) नारायणा आम्हा आज देई भेटी । फार झालो कष्टी माय बापा ।। ९) कोण्या काळी येशिल दिन बंधु । दत्त देवा सद्गुरु दयासिंधु ।। १०) अवतरिसी, उन्क्रमिसी। आषाढ वद्य पंचमीसी ।। आणि शेवटी ११) देई मला इतुके गुरुराया । प्रीती जडो

तुझिये गुण गाया ।। ही प्रार्थना म्हणण्यात आली.

**श्रावण मासातील उत्सवाची पदे**

गुरुवार दि. ३० जुलै २०२० ला (श्रावण शुद्ध एकादशी - पुनदा एकादशी) होती. गुरुवर्य श्री भाईंची जयंती. सकाळी एकादशणी करण्यात आली. त्यावेळी १) माझी देवपूजा, देवपूजा २) मनोभाव जाणुनि माझा । सगुण रुप धरिले ओजा । ३) हसतमुख पाहूं या डोळां । आजि श्री रामचंद्र भोळा ।। ४) अनंत जन्मीचे पुण्य फळां आले । पाय हे लाधले सद्‌गुरुचे ।। ५) जन्मलासी टाळी कुळी तुम्ही गुरुवरां। टाकी म्हणजे त्यागी अर्थ शोभतो खरा ।। ६) सनाथ करावे अनाथांच्या नाथा । ठेवियला माथा चरणावरी ।। ही प्रार्थना शेवटी म्हणण्यात आली. सायंकाळी ७.४७ वाजता जन्मोत्सव संपन्न झाला. त्यावेळी १) बाळा जो जो रे कुलभूषणा । श्री शंकर नंदना ।। २) विश्व डोलारा माजि आत्मा हरी ।। हा पाळणा म्हणण्यात आला. ३) आजिचा दिवस सोनियाचा वाटे । रामचंद्र भेटे बालरूपे ।। ४) छत्र सिंहासनी सद्‌गुरु देखिला । ध्यानस्थ बैसला रामचंद्र ।। ५) एकादशी श्रावण शुद्ध मासी । हे साधिली तव कृपे बरवी अम्हांसि ।। ६) आस इतुकी उरली की । मिठी मारीन सद्‌गुरुसि ।। ७) मधुर मधुर मधुर बहु । मुरली तुझी रे हरि ।। ८) जन्मलाति टाकी कुळी तुम्ही गुरुवरां । टाकी म्हणजे त्यागी अर्थ शोभतो खरा ।। ह्या पदाने सांगता झाली.

मंगळवार ११ ऑगस्ट २०२० (श्री कृष्ण जयंती व लक्ष्मण महाराज (इंदूर) पुण्यतिथी दिन) श्री कृष्ण जन्मोत्सव रात्रौ १२ वाजता संपन्न होतो. तेव्हा रात्रौ १० ते १२ श्री रमावल्लभदासाची पदे म्हणण्यात येतात. त्यानंतर १) बाळा जो जो रे कूलभूषणा । वसुदेव नंदना ।। २) विश्व डोलारा माजि आत्मा हरि ।। ३) तेरो ध्यान गोपाळा । निसदिन लागो रे ।। ही प्रार्थना म्हणण्यात आली.

बुधवार १२ ऑगस्ट २०२० रोजी (श्रावण वद्य अष्टमी) गोपाळकाला सद्भक्ती मंदिराचा वर्धापन दिन होता. एकादशणी करण्यात येते. १) त्यावेळी माझी देवपूजा, देवपूजा २) मनोभाव जाणुनि माझा । सगुण रुप धरिले ओजा ।। ३) प्रेममंदिर वाढदिवस आजि करूं बरा ।।४) जीवा कासया कष्टसि। त्यजुनि कृष्ण



दिली. आपल्या सद्‌गुरुंनी सोपवलेली ही जबाबदारी श्रीधरपंतांनी मन लावून पार पाडली.

सद्भक्ती प्रकाश हे नियतकालिक सद्भक्ती मंदिरातील घडामोडींची, उत्सव-महोत्सवांची आणि मुख्य म्हणजे श्री भाई आणि श्री दादाभाईंच्या वेळोवेळी झालेल्या प्रवचनांची विस्तृत माहिती भक्तगणांकडे पोहोचवित होतेच. त्याच धर्तीवर एखादे नियतकालिक बाळगोपाळांकरिता सुरू करावे असा विचार गुरुवर्य श्री दादाभाईंच्या मनात येऊन त्यांनी तशी प्रेरणा श्रीधरपंत आणि त्यांचे सहकारी ह्यांना दिली आणि "वृंदावन" ह्या मासिकाचा जन्म झाला. श्री दादाभाईंच्या मार्गदर्शनाखाली ह्या "वृंदावन" मासिकाची यशस्वी वाटचाल सुरू झाली आणि श्रीधरपंत व त्यांच्या सहकाऱ्यांनी श्री भाई आणि श्री दादाभाईंची शिकवण सोप्या भाषेत मंदिरातील बाळगोपाळांना उपलब्ध करून देऊन फार मोठी सेवा रुजू केली.

शिस्तप्रिय, वक्तशीरपणा, साधी राहणी, नम्र पण स्पष्टवक्तेपणा असे गुण श्रीधरपंतांच्या अंगी असल्यामुळे लवकरच ते सर्वत्र लोकप्रिय झाले आणि सरस्वती बागेतील पालक आपल्या मुलामुलींना बाळमंडळाच्या नित्य सेवेला आग्रहाने पाठवू लागले. त्यांना खात्री होती की श्री टाकी महाराजांचे उदात्त विचार, सद्भक्ती मंदिरातील उच्च संस्कार आणि श्रीधरपंतांची उत्तम शिकवण, ह्यातून त्यांच्या मुलांचा उद्धारच होईल.

असंख्य मुलामुलींनी बाळमंडळ ह्या नित्यसेवेचा लाभ घेतला आणि आज त्यातील अनेक जण उच्च पदावर आहेत, किंवा फार मोठ्या पदावरून निवृत्त झाले आहेत. जे त्या काळी त्यांना सद्भक्ती मंदिरात लाभलेल्या संस्कारांमुळे त्यांना कसा फायदा झाला ह्याची कृतज्ञतापूर्वक आठवण काढताना दिसतात.

बालसंस्कार, शिशुसंस्कार हे विषय अलीकडे अलीकडे उदयास आले. पण जवळ जवळ ७० वर्षांपूर्वीच श्री दादाभाईंनी ह्यांची मुहूर्तमेढ सद्भक्ती मंदिरात रोवली होती. श्रीधरपंतांना व्यायामाची अत्यंत आवड होतीच. शिवाय गुरुवर्य श्री दादाभाईंनी सूर्यनमस्काराचे महत्व विशद करून सांगितल्यामुळे सूर्यनमस्कार त्यांना अति प्रिय झाले. त्यांचे समकालीन गुरुबंधू त्यांची आठवण सांगताना म्हणतात की एखाद्या दिवशी काही कारणामुळे जर सूर्यनमस्कार घालता आले नाहीत तर ते फार

# शोकवृत्त

कळविण्यास अत्यंत दु:ख होत आहे की आपल्या सद्भक्ती मंदिरातील एक ज्येष्ठ आणि श्रेष्ठ भक्त, ज्यांचा मंदिराच्या वाटचालीत, मंदिराच्या प्रगतीत, मोलाचा वाटा होता, ते श्री. श्रीधर काशिनाथ वाघ दि. १ सप्टेंबर २०२० रोजी श्री भाई दादाभाई ह्यांच्या चरणी विलीन झाले.

श्रीधरपंतांच्या जन्म दि. १७ फेब्रुवारी १९३२ रोजी कारवार येथे, म्हणजे प. पु. श्री बाबांची काही काळातील कर्मभूमी येथे झाला. वास्तविक पाहता त्यांचे व्यवहारातील नाव पांडुरंग असे होते. लहानपणी त्यांचे उच्चार अस्पष्ट होत असत. एके दिवशी गुरुवर्य श्री दादाभाईंनी त्यांना आपल्या जवळ बोलावून घेतले आणि तोंड उघडून जीभ बाहेर काढायला सांगितले. त्यांनी तसे करताच श्री दादाभाईंनी बह्मा-विष्णु-महेशा ह्या दिव्य मंत्राचा जप करीत त्यांच्या जिभेवर 'श्री' हे अक्षर तुळशीच्या पानाने काढले.

त्या सरशी श्रीधरपंतांच्या वाणीतील अस्पष्टपणा कायमचा नाहीसा होऊन ते अस्खलितपणे बोलू लागले. गुरुवर्य श्री दादाभाईंनी "आजपासून ह्याला श्रीधर असे संबोधिण्यात येईल" असे तेथे उपस्थित असलेल्या भक्तगणांना सांगितले आणि त्या क्षणापासून ते श्रीधर ह्याच नावाने सर्वत्र प्रसिद्ध झाले.

श्रीधरपंतांना इलेक्ट्रिकल विषयात विशेष रुची असल्यामुळे त्यात त्यांनी प्रमाणपत्र आणि प्राविण्य मिळविले. ह्या कामातील त्यांची कुशलता पाहून इंडियन एअरलाईन्स कंपनीने त्यांना ताबडतोब कामावर बोलावून घेतले आणि पुढे ते त्यांच्या प्रामाणिक सेवेमुळे आणि अथक परिश्रमांमुळे मेंटेनन्स-इन-चार्ज ह्या पदाला पोहोचले.

परंतु श्रीधरपंत मात्र त्याचे सारे श्रेय श्री दादाभाईंना देत.

श्रीधरपंतांच्या पूर्वपुण्याईने म्हणा किंवा त्यांचे पिताश्री श्री. काशिनाथ वाघ ह्यांच्या गुरुभक्तीमुळे म्हणा, त्यांना गुरुवर्य श्री दादाभाईंचा बराच सहवास लाभला, जेणेकरून श्रीधरपंतांची आध्यात्मिक उन्नती उत्तरोत्तर होत गेली.

त्यामुळेच, गुरुवर्य श्री दादाभाईंनी लहान मुलांकरिता जेव्हा बाळमंडळ स्थापन केले तेव्हा त्याची जबाबदारी श्रीधरपंत आणि इतर जबाबदार व्यक्तींच्या खांद्यावर



चरणां ।। ५) म्यां शंकर पुजिला, भावे पुजिला ।। ६) श्लोक - प्रथम वंदुनि श्री हरि श्रीपती । नमूं विधि सरसिज देवा प्रति ।। अत्रि चरणां स्वगिरी धरुं । अथन आश्रय नरांसचि स्मरु ।। ७) साकी - नारायणद्वय, राधाकृष्ण हाजि धरुनि हाता । शंकरसुत श्री रामचंद्र प्रभुचरणी ठेवू माथा ।। वामन पंडित रामदास तुकाराम श्री नाथा । काया वाचा मन सेवुनि नमन करु या संता ।। ८) श्लोक - श्री रामचंद्र प्रभु आत्मजाला । प्रेमे प्रणाम करू टाकी कुळ आत्मजाला ।। सद्भक्ती मंदिर उभारुनि मंडळीते । स्थापुनिया करूं प्रसारचि कार्य तेथे । श्रीदत्तपंचकाची कृपाच फळास आली । सद्भक्ती मंदिर इमारत सिद्ध झाली ।। श्री वामने करवुनि प्रवेश नामे । सात्विक बहु जेथ उभारिले श्रीरामे ।। ९) श्री रामचंद्र चरणांबुजी गुंग व्हावे । भृंगे मने अनुदिन अति शुद्ध भावे । सश्रद्धये श्रवण कीर्तन ते घडावे । श्री विष्णुच्या हृदया नित्य सुखे रहावे ।। १०) श्रीकृष्ण चिन्मय चरणी मागू हेंचि दान। सहृदय कल्पद्रुम समान आन ।। ही प्रार्थना शेवटी म्हणण्यात आली.

**भाद्रपद महिना**

गुरुवार दि. ३ सप्टेंबर २०२० (भाद्रपद वद्य प्रतिपदा) या दिवशी सद्गुरु श्री दादाभाई महालय दिन होता. सकाळी एकादशणी करण्यात आली. १) माझी देवपूजा, देवपूजा २) मनोभाव जाणुनि माझा । सगुण रूप धरिले ओजा।। ३) गुरुचे भजन, हेचि माझे ध्यान । तेंचि पूर्ण ज्ञान माझे ।। ४) अर्पियला निजप्राण देवा ।। ही प्रार्थना व पदे म्हणण्यात आली.

**: इति :**

*लॉकडाऊन असूनही सर्व उत्सवांच्या एकादशण्या थोडक्यात करून त्यात खंड न पडू देता जी सेवा काही मोजक्या सद्भक्तांनी केली त्याबद्दल त्यांचे कौतुक व आभारही !*

# श्री गुरुवर्य
# श्री भाईंचे प्रवचन

।। श्री सद्‌गुरुभ्योनमः ।।

**१२.३.१९३१**

*'विधीतें पाळीत । निषेधातें गाळीत ।*
*मज देऊनी जाळित । कर्म फळें ।।*
*मनाचा मारु न करितां । इंद्रियांतें दुःख ने दितां।*
*येथें मोक्ष असे आईता । श्रवणामाजी।।'*

आज आपणाला श्रवणासंबंधानें चार शब्द बोलावयाचे आहेत. परंतु श्रवण महिमा वर्णन करण्यापूर्वी श्रवणाला अधिकार कसा प्राप्त होतो ह्याचे आधी विवेचन करू :- "करुनि विहित कर्मे साधिली चित्त शुद्धि । श्रवण मनन मात्रीं योग्यता हेचि सिद्धि ।।" पहिल्या प्रथम वर्णाश्रमाप्रमाणें विहित कर्माचरण केले पाहिजे. वैदिक, लौकिक व स्वाभाविक अशी तीन प्रकारची कर्मे आहेत. परंतु ह्या तीन जातीच्या कर्मांमध्ये आणखी पोट भेद आहेत :- कर्म, अकर्म व विकर्म. जन्मापासून मरेपर्यंत ज्या काही बऱ्या वाईट क्रिया मनुष्याच्या हातून होतात. त्यांचा 'कर्म' ह्या शब्दात समावेश होतो. "काया वाचा अथवा मन । करिजे तितुकें कर्म



९) जी मोलें घेऊनि समाधी । स्वयें होय विषय विलासी । तो विसरे देहभानासी। द्वैत त्यासी भासेना ।। उन्माद रस विचित्र । मेळवूनी केले एकच । त्यांचा एवढा बडिवार । क्षण संसार विसरवी । सकळ रसांचे रसपान । जे गोडियेमाजा होती निमग्न । तो ब्रह्मरस सेविलिया जाण । संसारभार केवि उरे ।।

१०) 'बरं एको गुणी पुत्रः' - अनेक ताऱ्यांनी अकलेचे तारे तोडल्याचे दुःख भोगण्यापेक्षा सारे कूल प्रकाशित करणारा एकच सुखद चंद्रमा परमेश्वराने द्यावा.

११) उचित श्रद्धा, उचित ज्ञान आणि उचित आचरण या गोष्टी समाजाच्या अंतर्बाह्य पारमार्थिक उत्कर्षासाठी साह्यभूत असतात.

१२) समाजाच्या आंतरिक शक्तीच्या विकासाला अत्याधिक महत्त्व आहे. कोणतीही मूलगामी सुधारणा समाजाच्या वृत्तीत बदल झाल्याशिवाय शकत नाही. समाजाच्या वृत्तीत बदल करावयाचा असेल तर समाजाचे मनावर श्रेष्ठ विचारांचे व आधारांचे संस्कार नित्य होत राहिले पाहिजेत. अनुमूती हे तर प्रत्यक्ष आणि निर्विवाद प्रमाण मानावयास पाहिजे.

१३) धर्म-मार्तण्डांच्या खारट उपदेशाने दुःखितांच्या हृदय-व्रणावर मीठ शिंपडल्यासारखे होते. त्यांना कोणीतरी विचारावे की ह्यात आपल्याला काय आनंद प्राप्त झाला ? दुःखी दिलाच्या जखमीवर प्रेमाने फुंकर घालता येत नसेल, तर किमानपक्षी तिच्यावर मीठ चोळून अधिक दुःख तरी देऊ नये. 'पापाय परपीडा' हे लक्ष्यात ठेवावे.

१४) माणसाचे जीवन चांदण्यासारखं असतं. दुसऱ्याला प्रकाश देण्यासाठी त्याचं जीवन फुलवण्यासाठी.

१५) दिलेल्या फुलांच्या बदल्यात निखारे देऊ नये हातात.

१६) निवडुंगाचे फक्त काटेच दिसतात जगताला. त्यांच्या कुंपणामुळे कळ्या फुलांचे होणारं रक्षण दिसत नाही कुणाला.

१७) 'पुराव्याविण लिहिणे बोलणे । हे तर श्वानाचे भुंकणे ।' ह्या जातीचे वाग्बाणच समाजात उडत असतात.

१८) घरभेद्यांच्या कारवायाच बाह्य शत्रूपेक्षा अधिक हानिकारक ठरतात.

# परमप्रिय गुरुवर्य श्रीभाईंच्या प्रवचनांतील

## अमृत कण

१) मोगरा, चाफा, जाई, जुई इत्यादी सुवासिक फुलांच्या कळ्या फुलल्या की त्यांचा सुवास चहूकडे दरवळतो. वातावरण आल्हाददायक करून टाकतो. तद्वत् श्रीसद्गुरुकृपेने साधकाचे हृदय कमळ भ्रष्टसात्त्विक भावांनी फुलल्यावर ब्रह्मानंद प्रगट होतो.

२) चंदनाच्या ठिकाणी थोडासुद्धा सुवास नसलेला भाग सापडणार नाही. परिसाच्या ठिकाणी हीन अंग असू शकत नाही. ऊसाचे सर्वांग गोडच असते. तद्वत् संताचे पाहणे, ऐकणे, बोलणे इत्यादी सर्व व्यवहारा प्रेममय गोड असल्याने सर्वांना सुखदायी वाटतात.

३) गुरुच्या समागमांत राहून त्यांच्या आज्ञांचे तंतोतंत पालन केल्याने काया-वाचा-मने करून चित्तशुद्धि होते व तिघांना योग्य वळण लागते.

४) हजारो वर्षाचा गुहेतील अंध:कार एका क्षणार्धात दिवा जसा घालवून टाकतो तद्वत् गुरुचा सहवास अनेक जन्मांतील संस्काररूपी मळ नाहीसा करून हृदय निर्मळ करतो.

५) जन्ममरणाच्या फेऱ्यातून ज्यांना मुक्त होण्याची खरी तळमळ असेल त्यांनी केवळ गुरुच्या मार्गदर्शनानुसार अन्य विचारांना फाटा देऊन वागण्याचा निश्चय केला पाहिजे.

६) संत आयुष्यभर दुसऱ्याचे दु:ख आणि वेदना दूर व्हाव्यात म्हणून झटत असतात आणि झगडतात आणि स्वत: वेदनांचा भार आपल्या डोक्यावर घेतात.

७) सार्वजनिक जीवनातल्या जबाबदाऱ्या कसलाही वैयक्तिक लाभ्यांश नसूनही संत सांभाळत असतात.

८) केवळ दर्शनानेही परम संतुष्ट होणारे भक्तजन श्रेष्ठ दर्जाचेच मानले पाहिजेत. परस्परांना नुसते डोळे भरून पाहताच ज्यांचे हृदय सात्त्विक आनंदाने भरून येते, ते नि:स्वार्थी भाविक खरोखरच धन्य होत.



जाण । सूक्ष्म स्फूर्तीचे जे भान । तें मूळ जाण कर्माचें ।।" अंत:करणात नुसती स्फूर्ती उत्पन्न झाली की कर्म होते, पुढे त्या स्फूर्ती प्रमाणे क्रिया झाल्यावर तिचे क्रियमाण होते व त्या क्रियमाणाचे ठसे बुद्धिवर पडतात. देह पडल्यावर क्रियमाण संचितात जाऊन मिळते. त्यातून एक जन्म भोगण्याकरिता जे भगवान निवडून देतो, त्याला प्रारब्धी अशी संज्ञा आहे :- "संचितातून जगज्जीवन । प्रारब्ध करी नूतन । ते एक देह जन्म मरण । तो वरी भोगतो सुखदु:खाचा ।।" ह्या मुख्य कर्माच्या तीन जाती झाल्या. तसेच कल्पना स्फूर्ती कर्माचे ही तीन प्रकार आहेत. पहिले ते कर्म वेद विहित कर्म म्हणजे वेदाने शास्त्राने वर्णाश्रमास अनुचित जी कर्मे सांगितली आहेत ती कर्मे करणे. दुसरे अकर्म वेदाज्ञे प्रमाणे न करणे ह्याला अकर्म म्हणतात. खरे बोलावे, आईबापांची आज्ञा पाळावी असे वेद सांगतात. त्या वेदाच्या आज्ञेविरुद्ध आचरण करणे, म्हणजे खोटे बोलणे, आईबापांची आज्ञा मोडणे ह्याला अकर्म म्हणतात :- "वेद विहित न करणे अकर्म ।।" विकर्म म्हणजे वेदाने ज्या गोष्टी निषेधिल्या आहेत त्या मुद्दाम करणे. अभक्ष्य भक्ष करू नये ते करणे. दारू पिऊ नये ती पिणे, व्याभिचार करून नये तो अवश्य करणे वगैरे गोष्टी विकर्मांत मोडल्या जातात. "जें वेदीं निषेधिलें ते करणे विकर्म ।।"

येथपर्यंत कर्म, अकर्म व विकर्म या शब्दांचा प्रापंचिक दृष्ट्या अर्थ झाला. पण नुसते कर्म करून मोक्ष प्राप्त होणार नाही. ईश्वराने आपणाला जो नर देह दिला आहे. त्याचा योग्य उपयोग करून मोक्ष प्राप्त करून घेणे हाच खरा पुरुषार्थ होय. जन्मभर जरी कर्म करीत राहिले तर त्याच्या योगे जन्ममरण टळणार नाही. कारण जो पर्यंत विष पोटात जात आहे. तो पर्यंत मरण हे ठेविलेलेच आहे. तेव्हा ह्या कर्मरुपी विषारी सर्पाचा दात काढला असता तेच कर्म, अकर्म व विकर्मच सुकर्म होऊन ईश्वप्राप्ती करून देईल. तेव्हा आता आपण कर्म, अकर्म व विकर्म यांचा पारमार्थिक

अर्थ काय आहे हे पाहू. श्री नारायण महाराज म्हणतात की :- "कर्म करावे कासयासाठी । मुख्य व्हावी भगवद्भेटी । दग्ध व्हावी हृदय गाठी । प्रयोजन हे कर्माचें ।।" म्हणून "ईश्वरासाठी कर्म । ईश्वराकरितां अकर्म । ईश्वरनिमित्त विकर्म । तेंही करावें ।।" वडिलांची आज्ञा पाळावी : "पितृर्माता गरीयसी ।।" असे वेदाने सांगितले आहे. परंतु प्रल्हादाने व भस्ताने ती आज्ञा न पाळता ही त्यांचे ते अकर्म देखील सुकर्म होऊन त्यांना उत्तम गति प्राप्त झाली. तसेच "पतिरेव गुरु: स्त्रीणां" म्हणजे स्त्रीयांना पतीच गुरु अशी वेदाची आज्ञा असता गोपींनी ती अमान्य केली. तथापि त्यांना उत्तम गति प्राप्त झाली नाही असे कोण म्हणेल ? ह्या उदाहरणांवरून सहज अनुमान करिता येईल की कर्माची गति गहन आहे. "कर्मणो गहना गति: ।।" आता ह्या कर्मकचाटापासून कसे सुटावे व वर ज्यांची उदाहरणे दिली आहेत ते त्यापासून कसे सुटले याचा आपण विचार करू.

सत्संगतीत शास्त्र श्रवणाच्या द्वारे आपणास समजते की आत्मा अकर्ता आहे आणि पूर्व कर्मानुसार प्रकृति आपल्या हातून कर्म करविते :- "स्वभावस्तु प्रवर्तते" ह्या भावनेने कर्म कसे ही असले तरी ते बंधक होत नाही :- "मी एकु कर्म कर्ता । ऐसी उठो नेदी अहंता । ते कर्मचि अर्पी श्री अनंता । ईश्वराते ।।" ह्या एकनाथ महाराजांच्या वचनाप्रमाणे मुमुक्षूचे कर्म देखील ईश्वरार्पण होऊन, ते सुकर्म अगर कुकर्म असले तरी ते त्याला बद्ध करू शकत नाही. तो कर्माचा विधि किंकर नाही :- "एवं कर्माची चोदना । मद्भक्तांसी नाही जाणा । करितां श्रवण कीर्तना । कर्मबंधना नातळती ।।" ज्ञानेश्वर महाराज ही असेच प्रतिपादन करितात :- "विधीते पाळित । निषेधाते गाळित । मज देऊनि जाळित । कर्म फळें ।।" याचा स्पष्ट अर्थ असा आहे की वेद विहित कर्में करून त्यापासून होणाऱ्या परिणामाचे फळ चुकविण्यासाठी ते कर्मच ईश्वरार्पण करावे. वेद विहित कर्में चांगली आहेत खरी. पण जर ती ईश्वरार्पण केली नाहीत तर ती ही



| | | |
|---|---|---|
| शुक्रवार | दि. २६.३.२०२१ | ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण. सा. ५.३० नंतर. |
| शनिवार | दि. २७.३.२०२१ | नामसंकीर्तन सा. ५.३० नंतर. |
| रविवार | दि. २८.३.२०२१ | श्री गौरांगप्रभू जयंती दिन. |
| सोमवार | दि. २९.३.२०२१<br>(फाल्गुन कृ. १) | श्री दादाभाई पुण्यतिथी दिन. स. ११.३० वा.<br>श्रीगुरुपादुकांस एकादशणी त्रोटक चरित्राचे श्रवण (महानिर्वाणांक) आणि श्री दादाभाईंच्या ध्वनिमुद्रित प्रवचनाचे श्रवण.<br>शेजोत्सव रा. ८.०० वा. |
| मंगळवार | दि. ३०.३.२०२१<br>(फाल्गुन कृ. २) | श्री तुकारम महाराज पुण्यतिथी दिन.<br>(श्री तुकाराम बीज) |

**सूचना** : प्रत्येक उत्सव, महोत्सवाचे दिवशी प्रात: स्मरणानंतर 'श्रीगुरुस्तवन' व 'श्रीमद्वामन पादपद्मयुगुले' ही प्रार्थना म्हटली जाईल.

**वि. सूचना** : ह्या अंकात जरी पुढील उत्सव, महोत्सव दिलेले असले तरी ते कशा पद्धतीने साजरे होतील ते त्या त्या वेळच्या सरकारी आदेशावर अवलंबून असेल.

| | | |
|---|---|---|
| शनिवार | दि. २७.२.२०२१ (माघ पौर्णिमा) | श्री मंगेश महोत्सव. सायंभजनाचे वेळी श्री मंगेश महोत्सव ह्या विषयावरील प्रवचनाचे श्रवण. |
| रविवार | दि. ७. ३.२०२१ (माघ शु. ९) | श्री रामदास नवमी. सायंभजनाचेवेळी श्री रामदास स्वामींच्या चरित्रचे श्रवण. |
| गुरुवार | दि. ११.३.२०२१ (माघ कृ. १३) | महाशिवरात्री. सायंभजनाचे वेळी श्री भाईंच्या चरित्राचे श्रवण. (श्री रामेश्वर मंदिरातर्फे पालखी मिरवणूक. दुसऱ्या दिवशी सकाळी ६.३० वा.) |
| सोमवार | दि. १५.३.२०२१ | श्री रामकृष्ण जयंती. सायंभजनाचे वेळी श्री रामकृष्ण जयंती या विषयावर दि. ६ मार्च १९२७ रोजी श्री रामकृष्ण मिशन. खार येथे झालेल्या प्रवचनाचे श्रवण. |

**श्रीदत्तमूर्तीच्या व श्री नारायण महाराजांच्या सुर्वण पादुकांचा, श्री रामेश्वर मंदिराचा वर्धापन दिन व श्री रघुनाथस्वामी पादुका स्थापना दिन महोत्सव**

| | | |
|---|---|---|
| मंगळवार | दि. २०.३.२०२१ (फाल्गुन शु. ७) | श्री रघुनाथस्वामी पादुका स्थापना दिन. स. ११.३० वा. श्री गुरुपादुकांस एकादशणी. |
| बुधवार | दि. २४.३.२०२१ (फाल्गुन शु. १०) | श्री रामेश्वर व श्री दत्तपादुका स्थापना दिन. स. ११.३० वा. श्री गुरुपादुकांस एकादशणीव ब्राह्मणसंतर्पण. सायंभजनाचे वेळी जगदाराध्य त्रिमूर्तीच्या पादुकांची स्थापना या विषयावरील प्रवचनाचे श्रवण. श्रीगुरुपादुकांची पालखी मिरवणूक रात्रौ ८.३० वा. |
| गुरुवार | दि. २५.३.२०२१ (फाल्गुन शु. ११) | प्रात:स्मरणाचे वेळी श्री एकनाथ महाराजांचा फोटो ठेवला जाईल. सायंभजनाचे वेळी श्री एकनाथ महाराजांचे ओवीबद्ध प्रतिष्ठान चरित्र श्रवणास प्रारंभ |



बद्ध करणारी आहेत. म्हणून तत्वदर्शी लोकांनी म्हटले आहे की :- "पुण्यास पाप म्हणती अत एव योगी । आद्यंत पाप यद्यपि पुण्य भोगी ।। लोखंड रुप जशी पातक कर्म बेडी । बेडी सुवर्णमय हो तरी काय गोडी ।।" विहित कर्में यथासांग करून ती ईश्वरार्पण केली नाहीत आणि ती निष्काम बुद्धीने केली असली, तरी "कर्मणापितृलोक:।।" ह्या श्रुति नियमाप्रमाणे निष्काम अनर्पित कर्माचे फळ पितृलोक आहे. सकाम कर्माचे फळ स्वर्ग लोकप्राप्ति हें आहे. दोन्ही ठिकाणीं सुख आहे, पण त्या लोकाप्रत जाण्याआधी मरणाचें दु:ख सहन केलें पाहिजे. बरें तेथें गेल्यावर तरी सुख होते काय? नाही तेथली परिस्थिती ह्या लोकाहून अगदी उलट आहे. मृत्यूलोकी कोण किती काळ जगणार ह्याची कोणाला जाणीव नसते म्हणून "where ignorance is bliss, it is folly to be wise" "आपण किती काळ जगणार ह्याच्या अज्ञानांतच जेथे सुख आहे. तेथे पुढे काय होणार ह्याचे ज्ञान करून घेणे मूर्खपणाची गोष्ट आहे", ह्या म्हणी प्रमाणे अज्ञानामुळे मृत्यूलोकी थोडे बहुत तरी सुख भोगता येते. पण स्वर्ग लोकी गेल्यावर त्याला स्वर्ग लोकी किती वर्षे सुख भोगता येईल हे सांगण्यात येते म्हणून तेथले सुख भोगीत असताही आपल्या सुखाचे अमुक दिवस संपले व अमुक दिवस बाकी राहिले, ह्याची आठवण होऊन तो नेहमी दु:खातच असतो. शिवाय तेथे पुण्याईच्या न्यूनाधिक्याप्रमाणे कनिष्ठ अगर श्रेष्ठ दर्जाचे सुखोपभोग प्राप्त होतात. त्यामुळे स्वर्गस्थ लोकांमध्ये एक प्रकारचा मत्सर उत्पन्न होतो. शेवटी "क्षीणे पुण्ये मर्त्य लोकं विशंति ।।" (भ.गी. ९/२१), म्हणजे त्यांचे पुण्य संपले म्हणजे त्यांना स्वर्ग सोडून पुन्हा मृत्यू लोकात जन्मास यावे लागते. स्वर्ग सोडताना त्यांना जे दु:ख होते त्याचे वामन पंडितांनी वर्णन केले आहे, ते असे :- "जसा भाडियाचा तट्टू स्वर्ग तैसा । तयाचा असो मानितीलाभ कैचा ।। सरे पुण्य लोटूनिया देती तेव्हा । रडे स्फुंद स्फुंदो पडे मूळ तेव्हां ।। धरुनी

भुजीं कंठ देवांगनांचे । विमानी वनीं नंदनी तेथ नाचे ।। भुजें त्याच त्यांचे गळे ते धरूनी । रडे त्यांस टाकूनि जातां म्हणूनी ।।” सारांश जरी आपण शास्त्रांत सांगितल्याप्रमाणे यथासांग सकाम कर्म केलें तरी त्याचा परिणाम अशा तऱ्हेचा होतो. म्हणून सकाम कर्मांचा समूळ त्याग करून, सत्संगतींत राहून निष्काम कर्म ईश्वरार्पण करावे. तेणेंकरून “सत्संगें सद्गुरु भेटी पाहिं ।।” अंत:करण शुद्धि झाल्यावर ते संतच सद्गुरु होऊन त्याला ब्रह्मज्ञानाचा उपदेश करितात.

आता कोणी म्हणाले की आम्ही वेदांताची पुस्तके वाचून अंत:करण शुद्ध करून घेऊ आणि मग ज्ञान आपोआप होईल. त्याकरिता सत्संगतीची काय आवश्यकता आहे ? हा त्यांचा गैरसमज आहे. पुस्तके वाचून समाधान होते ते खरे समाधान नव्हे, आणि नुसती पुस्तके वाचून अनुभवजन्य ज्ञान कधीच व्हावयाचे नाही. ह्याला अनुलक्षून एक गोष्ट सांगतो जेणे करून हा मुद्दा अधिक स्पष्ट होईल. एकदा एका बाईने आपल्या घराच्या अंगणात डाळ वाळत घातली होती. तेथे एक गाय आली व तिने थोडीशी डाळ खाल्ली हे पाहून एका गृहस्थाने गाईवर एक दगड फेकला. दुर्दैवाने तो दगड तिच्या मर्मस्थानावर लागून ती तत्काळ मरण पावली. तेव्हा त्या गृहस्थाला फार दु:ख झाले. कारण ती मरावी असा त्याचा हेतू नव्हता. बरे, गोहत्या झाली त्याबद्दल प्रायश्चित घ्यावे तर जवळ पैसा नाही. तेव्हा त्याने विचार केला की आपण वेदांत पुस्तकात असे वाचले आहे की कर्ता करविता परमेश्वर आहे. आपण कोणाला मारीत नाही व कोणी आपल्याला मारीत नाही. पाप आणि पुण्य ह्या दोहींचा ही संबंध आत्म्याला लागत नाही. तेव्हा ही गाय मी मारली नसून तिच्या मरण्याची क्रिया ईश्वराने मला उगीच निमित्त करून माझ्या हातून घडविली. तेव्हा हिचा खरा प्राणहर्ता ईश्वरच आहे. असा त्याचा विचार झाल्यावर ‘बरे आहे’ असे म्हणून ईश्वराने ते गोहत्येचे पाप आपल्याजवळ ठेवून दिले :- “तू



| | | |
|---|---|---|
| बुधवार | दि. ३.२.२०२१ (पौष कृ. ६) | श्री. तात्यासाहेब कोटणीस महाराज पुण्यतिथी दिन. |
| रविवार | दि. ७.२.२०२१ (पौष कृ. ११) | श्री पार्वतीमाता पुण्यतिथी दिन. स. ११.३० वा. एकादशणी. श्री पार्वतीमातेच्या चरित्राचे श्रवण सा. ५.३०वा. |

**परात्पर गुरु श्रीनारायणबाबा रत्नागिरीवासी व परमेष्ठी गुरु श्री राधाकृष्ण तोरणे महाराज यांचा पुण्यतिथी महोत्सव**

| | | |
|---|---|---|
| शुक्रवार | दि. १२.२.२०२१ (माघ शु. १) | मातोश्री श्री लक्ष्मीबाई रामचंद्र टाकी यांचा वैकुंठारोहण दिन. सा. ५.३० वा. प.पू. श्री लक्ष्मीमातेच्या त्रोटक चरित्राचे श्रवण. |
| शनिवार | दि. १३.२.२०२१ | श्री नारायणबाबा रत्नागिरीवासी व श्री राधाकृष्ण तोरणे महाराज पुण्यतिथी दिन स. ११.३० वा. एकादशणी. प.पू.श्री राधाकृष्ण तोरणे महाराज यांच्या त्रोटक चरित्राचे श्रवण सा. ५.३० वा. |
| रविवार | दि. १४.२.२०२१ (माघ शु. ३) | सा. ५.३० वा. नामसंकीर्तन. |
| सोमवार | दि.१५.२.२०२१ (माघ शु. ४) | श्री गणेश जयंती. सायंभजनाचे वेळी श्री सिद्धिविनायकाचे व्यापक स्वरूप ह्या विषयावरील प्रवचनाचे श्रवण. |
| मंगळवार | दि. १६.२.२०२१ (माघ शु. ५) | वसंत पंचमी, श्री शांतादुर्गा महोत्सव, सद्भक्ति बालमंडळ वाढदिवस. सा. ५.३० वा. रासलीलाभिनय व वैकुंठीचा प्रसादमेवा ह्या सद्गुरु दादाभाईंच्या आशिर्वादपर प्रवचनाचे वाचन. |
| बुधवार | दि. १७.२.२०२१ (माघ शु. ६) | महोत्सव समाप्ती. सायंभजनानंतर कळकळीची प्रार्थना. |
| सोमवार | दि. २२.२.२०२१ (माघ शु. १०) | श्री तुकाराम महाराज साक्षात्कार दिन. |

## मार्गशीर्ष (डिसेंबर)

| | | |
|---|---|---|
| गुरुवार | दि. २४.१२.२०२० (मार्गशीर्ष शुद्ध दशमी) | श्री निरंजन रघुनाथ स्वामी पादुका स्थापना दिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. |
| शुक्रवार | दि. २५.१२.२०२० (मार्गशीर्ष शुद्ध एकादशी - मोक्षदा एकादशी) | श्री गीता जयंती. सकाळी स्तवन व प्रार्थना. सकाळी १० वाजता सामुदायिक गीता पठण. सायंकाळी ५.३० वाजता श्री गीताजयंती निमित्य झालेल्या सद्गुरु श्री दादाभाईंच्या प्रवचनाचे वाचन. यावेळी श्री दत्तजयंती व श्री येशूख्रिस्त जयंती, नाताळ एकाच दिवशी आला. |
| मंगळवार | दि. २९.१२.२०२० (मार्गशीर्ष पौर्णिमा) | श्री दत्तजयंती. प्रात: स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. त्यानंतर महाप्रसाद. जन्मोत्सव सायंकाळी ६ वाजता पाळणा व इतर पदे. रात्रौ ८.३० वाजता पालखी, मिरवणूक. |
| बुधवार | दि.३०.१२.२०२० | सायंकाळी ६ वाजता ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण. |
| गुरुवार | दि.३१.१२.२०२० | सायंकाळी ६ वाजता नामसंकीर्तन व सुमधुर पदे. उत्सव समाप्ती व कळकळीची प्रार्थना. |

## पौष, माघ, फाल्गुन (जानेवारी, फ्रेबुवारी, मार्च २०२१) महिन्यातील कार्यक्रम, उत्सव व महोत्सव

| | | |
|---|---|---|
| शुक्रवार | दि. १.१.२०२१ | गोखिवरे (वसई, पूर्व) येथील श्रीकृष्णमूर्ती स्थापना दिन. |
| सोमवार | दि. ४.१.२०२१ (मार्गशीर्ष कृ. ६) | श्री मोरया गोसावी पुण्यतिथी आणि श्री रंगनाथ स्वामी पुण्यतिथी. |
| गुरुवार | दि. १४.१.२०२१ (मकरसंक्रांती) | सायंभजनाच्या वेळी 'तिळगूळ घ्या, गोड बोला' ह्या विषयावरील प्रवचनाचे श्रवण |



खोट्या ही दासाचा मान । खरा राखिसी नारायण ।।" पुढे काही वर्षांनी त्या गृहस्थाला शुक्राची महादशा झाली आणि त्याची बरीच भरभराट झाली. तेव्हा आपल्या हातून गोहत्या झाली आहे ह्याची त्याला आठवण होऊन प्रायश्चित घेऊन पाप मुक्त व्हावे असा विचार करून त्याने एक मोठा यज्ञ केला आणि समाप्तीच्या दिवशी सहस्रा ब्राह्मण संतर्पण केले आणि गावातील सर्व लोकांनीही भोजनास बोलाविले. नारायणाने तोपर्यंत धीर धरला व शेवटच्या दिवशी एका वृद्ध ब्राह्मणाचे रूप धारण करून तो यज्ञ मंडपात आला व यजमान कोठे आहेत म्हणून विचारपूस करू लागला. तेव्हा तेथील मंडळींनी त्याला सांगितले की तुम्हाला यजमानाशी काय करावयाचे आहे. येथे मुक्तद्वार आहे. तुम्ही प्रसाद घ्या आणि आपल्या कामाला जा. परंतु त्याने हट्टच धरला की यजमानाची भेट घेतल्याशिवाय मी अन्न ग्रहण करणार नाही. यजमानाची स्वारी जरीचा पितांबर नेसून, गळ्यात सोन्याची कंठी घालून व हातात चांदीचे फुलपात्र पळी घेऊन इकडे तिकडे फिरत होती. त्याच्या कानावर ही गोष्ट गेली तेव्हा ते त्या ठिकाणी गेले व काय आहे असे त्या ब्राह्मणाला विचारू लागले. ब्राह्मणाने विचारले की, "हा एवढा यज्ञ कोण करीत आहे?" त्यावर यजमान म्हणाला, "अहो! कोणी कोणी म्हणजे काय? तुमच्या पुढे भरजरीचा पितांबर नेसलेल्या व गळ्यात कंठी घातलेला जो मी उभा आहे, त्याने हा यज्ञ केला आहे." आता समजले काय? मी मी, मी असे त्याचे त्रिवार उच्चारलेले अहंकार युक्त शब्द ऐकताच जेवणास जमलेल्या सर्व मंडळीच्या समक्ष त्या ब्राह्मणाने आपल्या खांद्यावर असलेला रुमाल खाली टाकला आणि तो म्हणाला, "अरे, गोहत्येचे पातक तू मला देतोस व ह्या यज्ञाचे स्वामित्व तू अभिमाने स्वत: मिरवितोस काय? घे ही तुझी गाय" असे म्हणताच तेथे ती मृत गाय पडली आणि तो ब्राह्मण अदृश्य झाला. मग तेथे एकच गोंधळ उडाला. सारांश नुसती पुस्तके वाचून आत्मा अकर्ता कसा

आहे हे कळणार नाही. म्हणून श्रीबाबा म्हणतात :- “नसतां तो संत संग । चुकलों मी मला असंग । संसारी होऊनि मग्न । भोगितों उपाधि ।।” तसेंच सोहिरोबा म्हणतात :- “संत संगतीने समज । ध्यानीं आणूनि पुरते उमज । आपुले मतीने उगाच चिखल कालवूं नको रे ।।” सत्संगतींत हे सर्व आपोआप समजते येथपर्यंत असे सांगण्यात आले की निष्काम कर्म अनर्पित असेल, तर पितृलोक प्राप्त होईल, सकाम असेल तर स्वर्गादि लोक मिळेल, आणि कुकर्म असेल तर नरकांत किंवा जडमूढ योनींत वास करावा लागेल. परंतु हींच कर्मे-कर्म, अकर्म व विकर्म ईश्वराला अर्पण केली, तर त्यायोगें ईश्वर प्राप्ति होईल :- “कर्म चतुर्विध येथ । नित्य आणि नैमितिक । काम्य आणि प्रायश्चित । जाण निश्चित विभाग ।। येथ कर्म आचार निश्चितीं ।। सावधान राखावी वृत्ती । आचरावयाची व्युत्पत्ती । विचित्र स्थिती सांगने ।। नित्य आणि वैमित्तिक । हें कर्म जाण आवश्यक । सांडोनि फळाभिलाष । विधि प्रमुख आचरावीं ।। नित्यकर्म अधिक वाढें । तैं नैमित्त्याचें अंग चढे । काम्य उंचबळ विषय चाडें । तैंचि पडे निषिद्धीं ।। फलाभिलाषेविण । नित्य नैमित्तिक जाण । करावे गा कृष्णार्पण । अर्पिति खूण जाणोनी ।। काम्य कर्म आवश्यक । त्यागावें गा नि:शेष । जेवीं कां वमिलें वमक । परतोनि लोक न पहाती ।।”

“येथ म्हणसी कर्म कोण । अकर्माचे काय लक्षण । विकर्माचा कवण गुण । तेंही संपूर्ण पिरसपां ।। काया वाचा अथवा मन । करिजें तितुकें कर्म जाण । सूक्ष्म स्फूर्तीचें जें भान । तें मूळ जाण कर्माचें ।। मनसा वाचा देहीं । सर्वथा कर्म बीज नाहीं । अकर्म म्हणिजें तें पाहिं । न पडे ठायी देहवंता ।। जें कर्मा वेगळें सर्वांगे । जेथ कर्म लावितां ही न लगे । जें नव्हे कर्मठा जोगें । तेंजाण सवेगें अकर्म ।। विधि निषेध जोड पाडें । जेथे विशेष कर्म वाढें । विकर्म



| | | |
|---|---|---|
| गुरुवार | दि. ५.११.२०२० (आश्विन वद्य चतुर्थी) | सायंकाळी ६ वाजता ध्वनिमुद्रित पदांचे श्रवण व समाप्ती दिन व कळकळीची विनंती. |
| गुरुवार | दि.१२.११.२०२० (आश्विन वद्य द्वादशी) | गुरुद्वादशी - सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. सायंकाळी ५.३० वाजता गुरुद्वादशी निमित्य झालेल्या गुरुवर्य श्री भाईंच्या प्रवचनाचे वाचन. ८.३० वाजता पालखी मिरवणूक. |
| शनिवार | दि.१४.११.२०२० (आश्विन वद्य चतुर्दशी) | नरकचतुर्दशी. सकाळी स्तवन व प्रार्थना. सकाळी १०.०० वाजता श्री रामेश्वर मंदिरात ‘उद्धव-गोपी’ गीताचे सामुदायिक भजन व इतर पदे. |
| सोमवार | दि.१६.११.२०२० (कार्तिक शुद्ध प्रतिपदा) | बलिप्रतिपदा. प्रात:स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना. सकाळी १०.०० वाजता सुखासना निमित्त झालेल्या सद्गुरु श्री दादाभाईंच्या प्रवचनाचे वाचन. ११.३० वाजता एकादशणी. |
| बुधवार | दि.२५.११.२०२० (कार्तिकी - प्रबोधिनी एकादशी) | प्रात:स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना. सायंकाळी ५.०० वाजता ‘पंढरीचा प्रसादमेवा’ या सद्गुरु श्री दादाभाईंच्या प्रवचनाचे वाचन. |
| रविवार | दि.२९.११.२०२० (कार्तिक शुद्ध चतुर्दशी - वैकुंठ चतुर्दशी) | गुरुवर्य श्री भाईंचा अस्थिविसर्जन दिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. ८.३० वाजता कमळ वाहणे. |
| सोमवार | दि.३०.११.२०२० (कार्तिक पौर्णिमा - त्रिपुरारी पौर्णिमा) | सकाळी स्तवन व प्रार्थना. रात्रौ ८.३० वाजता श्री रामेश्वर मंदिरातर्फे पालखी मिरवणूक. |
| सोमवार | दि. ७.१२.२०२० (कार्तिक वद्य सप्तमी - अष्टमी) | श्री काळभैरव जयंती. प्रात: स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना. |
| रविवार | दि. १३.१२.२०२० (कार्तिक वद्य त्रयोदशी) | श्री ज्ञानेश्वर महाराज पुण्यतिथीदिन. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. |

।। श्री सद्‌गुरु प्रसन्न।।

## आश्विन, कार्तिक, मार्गशीर्ष महिन्यातील उत्सव व महोत्सव (ऑक्टोबर ते डिसेंबर २०२०)

| | | |
|---|---|---|
| शनिवार | दि.१७.१०.२०२० (आश्विन शुद्ध प्रतिपदा) | घटस्थापना. प्रात:स्मरणाचे वेळी स्तवन व प्रार्थना. प्रतिपदा ते नवमीपर्यंत सायंकाळी ५ वाजता नवरात्रौपासना, दुर्गास्तोत्र, व 'कलौ चंडी विनायको'चे वाचन. |
| रविवार | दि.२५.१०.२०२० (आश्विन शुद्ध दशमी) | विजयादशमी - दसरा. सद्‌भक्ती प्रसारक मंडळीचा वाढदिवस. सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. ११.३० वाजता एकादशणी. सायंकाळी ५ वाजता प्रवचन, वाचन व सोने वाटप. सायंकाळी ६.३० वाजता पालखी मिरवणूक. ही पालखी सारस्वत कॉलनी व हिंदू फ्रेंडस सोसायटी. या दोन्ही सोसायट्यामधून प्रस्थान करते. |

### गुरुवर्य श्री भाईंचा पुण्यतिथी महोत्सव

| | | |
|---|---|---|
| शुक्रवार | दि.३०.१०.२०२० (आश्विन पौर्णिमा - कोजागिरी पौर्णिमा) | सकाळी ७ वाजता स्तवन व प्रार्थना. सायंकाळी ५ वाजता गुरुवर्य श्री भाईंच्या प्रथम पुण्यतिथी दिनी झालेल्या सद्‌गुरु श्री दादाभाईंच्या प्रवचनाचे वाचन. सायंकाळी ७ वाजता श्री कृष्ण भक्तिपर पदे व रासलिलाभिनय. |
| मंगळवार | दि. ३.११.२०२० (आश्विन वद्य तृतीया) | गुरुवर्य श्री भाईंची पुण्यतिथी व श्री बाळेकुंद्री महाराज पुण्यतिथी दिन. प्रात: स्मरणानंतर स्तवन व प्रार्थना. ११.३० वा. एकादशणी. त्यानंतर ब्राह्मण सुवासिनी संतर्पण व महाप्रसाद. सायंकाळी ५.३० वाजता चरित्र वाचन व इतर पदे. रात्रौ ८.३०वाजता शेजोत्सव |
| बुधवार | दि. ४.११.२०२० | सायंकाळी ६ वाजता नामसंकीर्तन. |



त्यातें म्हणणें घडे । थोर सांकडे पैं याचें । कर्म सर्व साधारण । तेंचि विकारातें पावलें जाण । उठिलें विधि निषेध दारूण । विकर्म जाण तें म्हणिजे ।।"

येथ पर्यंत कर्म, अकर्म व विकर्म ह्यांविषयी विवेचन झाले. आता सर्व शास्त्रांनी कर्म, उपासना व ज्ञान ही तीन मोक्षाची साधने सांगितली आहेत. कोणी भक्ती, ज्ञान व वैराग्य अशी साधने सांगतात. पण त्याचा अर्थ एकच. ते 'कर्मालाच' वैराग्य म्हणतात आणि उपासनेला भक्ती म्हणतात. कर्माचें पर्यवसान वैराग्यात होते. म्हणून श्रुति म्हणते, "त्यागेनैके अमृतत्त्व मानशुः ।।" तद्वत् "ज्ञाना देवतु कैवल्यम्" असे कोणी प्रतिपादन करितात, आणि श्री शंकराचार्य म्हणतात की :- "मोक्ष कारण सामग्र्यां भक्तिरेव गरीयसी ।।" तेव्हा ह्या तीन वचनांपैकी कोणते वचन ध्यानात ठेवून प्रयत्न करावा असा प्रश्न पुढे येतो. एक म्हणतो वैराग्य पाहिजे, दुसरा म्हणतो ज्ञान पाहिजे आणि तिसरा म्हणतो भक्ति पाहिजे. ह्याचा उलगडा एक दृष्टांत देऊन करतो. मराठी शाळेचा क्रम 'वैराग्य' समजा, हायस्कूलचा क्रम 'उपासना' व कॉलेजमधली बी.ए. पर्यंतचा क्रम 'ज्ञान' समजा. मराठी शिकणाऱ्या मुलाला आपण सांगतो की, मराठी चौथी इयत्ता पास हो म्हणजे तू बी.ए. होशील. म्हणजे प्राथमिक शिकताच बी.ए. होता येते असा याचा अर्थ नाही. त्याचप्रमाणे "त्यागेनैके अमृतत्व मानशुः ।।" म्हणजे नुसत्या वैराग्याने मोक्ष प्राप्त होतो असे नाही, तर वैराग्याचे पर्यवसान भक्तींत होते व भक्तीच्या योगाने अंत:करण शुद्धि झाली म्हणजे सद्गुरु कृपेकरून ज्ञान प्राप्त होते आणि ज्ञानाच्या परिपाकें करून मोक्ष प्राप्त होतो, जसे मराठी शाळेच्या अभ्यास क्रमाचे पर्यवसान हायस्कूलच्या अभ्यासक्रमात होते. आता जर एखादा विद्यार्थी मराठी शाळेतच रखडला अगर त्याने पुढचा क्रम चालविला नाही, तर तो बी.ए. कधीच होणार नाही. तद्वत् एखादा मनुष्य जर आजन्म कर्म करीत राहिला

तरी त्याला ज्ञान कधीच होणार नाही. बरे, कोणी जर नुसते हायस्कूलचे शिक्षण घेतले तर तो बी.ए. होणार नाही. तद्वत् नुसते ज्ञान होऊन जर आरुरुक्षूनें भक्ति  केली नाही, तर त्याला सायुज्यताच मिळेल. पण वैकुंठातले सुख सोहळे त्याला अंतरतील. हायस्कूलची परीक्षा पास होऊन कॉलेजात अभ्यास करून युनिव्हर्सिटीच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन विद्यार्थ्याला बी.ए. होता येते. तद्वत ज्ञानयुक्त भक्तीच्या परिपाके करून भक्ताला वैकुंठात माझ्या भक्तीचे सोहळे भोगता येतात :- "गंगा सागरीं मिनली मिळे । मीनली त्याचीच त्यावरी लोळे । तैसा भक्त मिळोनी भावबळें । माझे भक्तीचे सोहळे मज माजी भोगी ।।"

आता कर्म कोठपर्यंत केले पाहिजे ह्याचा आपण विचार करू. रामदास स्वामींनी कर्माचें वर्म सांगितले आहे. ते असे :- "पळशी तू तरी नाम कोठें नेशी । आम्ही अहर्निशी नाम घोकूं ।।" येथें घोकूं असे म्हटले आहे. कारण ईश्वराला कर्मापेक्षा नाम फार आवडते. तो नामाचा अतिशय भुकेलेला आहे :- "तुका म्हणे यासी कीर्तनाची गोडी । प्रेमें घाली उडी नामासाठीं ।।" म्हणून रामदास स्वामी म्हणतात :- "आम्हां पासूनिया जाता नये तूज । तेंचि वर्म बीज नाम जपूं ।। देवा आम्हा तुझें नाम हो पाहिजे । मग भेटी सहजे देणे लागे ।। भोळे भक्त आम्ही चुकलेसें कर्म । सापडलें वर्म रामदासा ।।" सारांश कर्माचे वर्म नाम हे आहे. कारण नामाशिवाय कोणत्याही कर्माची सांगता होत नाही. "कीं हरिनामे कर्म सांग सफळ । हरि नामें कर्म निर्मळ । हरिनामे कर्म ब्रह्म दाखवी केवळ । चित्त शुद्धि करूनी ।।" म्हणून कर्माचे वर्म समजे पर्यंत कर्म केलेच पाहिजे. तसेच नामाचेही वर्म समजले पाहिजे. केव्हा केव्हा नाम घेऊन ही काही फळ प्राप्ति होत नाही :- "जपी तपी हे अवघे गपी रे । ते भासती केवळ मद्यपी रे । क्रिया सरे जो निज मद्यपी रे । नाचे तयाच्या पद मंडळी रे ।।" नामाचे वर्म हे आहे की नाम घेऊन लागले की नामाची गोडी लागली



अमोल आहे, त्याची किंमतच होत नाही. श्रीतु. महाराजांची ही भावना असल्यामुळेच त्यांच्या वाणीचा परिणाम होत असे. अशी निस्पृहता ज्याच्या अंगी असेल त्याच्याच हातून जगताचे कल्याण होईल. श्रीतु. महाराजांचे अशाप्रकारचे सर्व चरित्र अलौकिक होते. सामान्य माणसांप्रमाणे नव्हते. त्यांनी जगताला दाखविले की केवळ विठोबाच्या एका नामानेच मला ही स्थिती प्राप्त झाली, तेव्हा असे हे नामाचे माहात्म्य आहे.

झाले? विवेकानंद म्हणाले ते काय सांगू! त्यांचे रहस्य मी सांगून तुम्हाला समजणार नाही त्यासाठी तुम्हाला हे American Shore सोडून Indian Shore गाठले पाहिजेत व तेथे श्रीरा. परमहंसासारखा महात्मा शोधून त्यांचे चरण धरले पाहिजेत. मग हा अनुभव येईल. पण त्यांना स्वामी विवेकानंदाचे चरण धरण्याची बुद्धि झाली नाही किंवा तुम्ही एवढे आमच्या देशात असता आम्हाला का तिकडे जायला सांगता हे विचारायला सुचले नाही. स्वामींनी श्री रामकृष्ण परमहंसांना धीटपणे विचारले की तुम्ही देव पाहिला का? त्यांच्या धीटपणाला हसून श्रीरा. प. म्हणाले मी पाहिला आहे व तुलाही दाखवतो व प्रथम भेटीतच त्यांना समाधी लावून एकेक देहाच्या पलीकडे नेले. कधीही न पाहिलेली वस्तू पाहिली की वृत्ति तटस्थ होते. विवेकानंद ते पाहून घाबरले व नको नको म्हणू लागले. समाधीत अत्यंत सुख आहे मग ते नको का म्हणाले तर तेथे (तटस्थावस्था) खरे सुख नाही. खरे सुख घेण्यास शुद्धि बुद्धि झाले पाहिजे. दिव्यचक्षू प्राप्त झाले पाहिजे तरच ते स्वरुप दिसेल. (संत सनकादिक आमुचे पाहती कवतुक ।। तु.म.) कौतुक म्हणजे परमार्थाच्या लीला तेव्हा श्रीतु. महाराज म्हणतात की ह्या लीला चर्मचक्षूंना दिसणार नाहीत. त्या दिव्यचक्षूंना दिसतील. म्हणून श्रीतु. महाराज ज्यावेळी वैकुंठाला गेले ते कोणी पाहिले नाही. विमान ते शुद्धसत्वाचेच ते पाहताच सर्वांचे डोळे दिपून गेले. श्रीतु. महाराजांचा हा देह पंचमहाभूतांना देऊन टाकिला व आपण बनविलेल्या शुद्धसत्वाचा देह तो घेऊन विमानात बसून भजन करीत गेले. ते विमान बरेच दूर गेल्यानंतर ह्या मंडळींना हळूहळू दिसू लागले पण पाहतात तो काय! श्रीतु. महाराज नाहीत. त्यांचा देहही नाही. ह्या लीलेत त्यांनी काय दर्शविले की मी कोणाचेही ऋण ठेवले नाही. कोणाकडे कीर्तनाला गेले तर स्वत: तर काही घेत नसत पण घोड्यालाही घरून चारा नेत. कारण कीर्तन करून काही घेतले तर नामाची विक्री होते ही भावना, नाम हे



पाहिजे व भगवंताच्या ठिकाणी प्रेम उत्पन्न झाले पाहिजे. तसेच मुखाने राम घेताना चित्ताचे आणि स्वरूपाचे ऐक्य झाले पाहिजे. तरच त्यापासून पूर्ण फलप्राप्ती होईल. नाही तर :- “नाम रुपीं नाही मेळ । अवघा वाचेचा गोंधळ ।।” एकनाथ महाराज म्हणतात :- “नामें चित्त शुद्धि चित्ती । स्वरूप स्थिती साधकां ।।” असे झाले म्हणजे भगवान म्हणतात :- “नामरुपी जडलं चित्त । त्याचा दास मी अंकित ।।”

“आत्मज्ञ होऊनि ही जे भजती मुकुंदा । त्याचा सदा करिती जे श्रवणादि धंदा ।। आत्मैक्य भक्ति हृदयीं गुण दिव्य कानीं । ते सिद्ध होऊनि कदापि न होती मानी ।।”

सारांश नामाची मर्यादा ज्ञान होईपर्यंत असून, नामाची व स्वरूपाची सांगड लागे पर्यंत आहे. ज्ञान प्राप्त झाल्यावर ज्ञानी भक्त अशीरीतीने नाम घेतो :- “जपेवीण नाम वदनीं ।।” तो “राम राम” असे म्हणत बसत नाही. नाम घेऊन जें फळ मिळते, ते त्याला नाम न घेता प्राप्त होते. कारण राम नामाशिवाय त्याचा एक क्षण रिकामा जात नाही. जेव्हा तो अशा रीतीने नाम घेतो तेव्हा तो सिद्ध होतो. म्हणून नामाचे फळ अगर वर्म हे ज्ञान म्हणजे स्वरूपाशी ऐक्य पावणे हे होय. परंतु नुसते ज्ञान प्राप्त होऊन त्या भूमिकेवरच बैठक मारून बसणे हे ही ठीक नाही. ज्ञानाची परिपक्वत्ता अगर सिद्धि झाली पाहिजे. ती होण्यास ज्ञानाचे वर्म समजले पाहिजे. “ज्ञानाचे फळ ते हे की देखे आत्मा चराचरीं । आत्मयांत चराचर... तेव्हा तो सिद्ध बोलिजे ।। जो सर्व भूतें आत्मयांत पाहे । आणि पाहे की आत्माच सर्व भूंती आहे । मग तो ऐसा होऊनि राहे । कीं नव्हे जुगुप्सित तो त्या परी ।।” “यस्तु सर्वाणि भूतानि आत्मन्येवानुपश्यति । आत्मानं सर्व भूतेषु न ततो निजगुप्स्यते ।।”

अशारीतीने जरी ज्ञानी सिद्ध झाला तरी ज्ञानाचे वर्म काय आहे हे त्याला समजले असे म्हणता येणार नाही. तुकाराम महाराज म्हणतात :-

"आणिक नये माझ्या मना । हो का पंडित शहाणा ।। आत्मनिष्ठ जरी झाले जीवनमुक्त । तरी भक्ति सुख दुर्लभ त्या ।। जाणे भक्ति नवविध । तुका म्हणे तोचि शुद्ध ।।" याचे कारण असे आहे की जरी ज्ञानी शहाणा म्हणजे अन्वय ज्ञानी असला, किंवा आत्मनिष्ठ झाला, तरी देहसंगामुळे त्याला आपण देह आहो ही भावना होईलच. मग विषय वासना वाढल्यामुळे किंवा कामक्रोध प्रबळ झाल्यामुळे तो पुन्हा पद भ्रष्ट होण्याचा बराच संभव असतो. पण जर त्याला भक्तिचे पाठबळ असेल तर सर्व स्थितीत त्याला समाधानाच राहील व कामक्रोधांचे ही त्याच्या भक्तिपुढे काही चालणार नाही. "सर्वांभूती भगवद्भावो । या नाव मुख्य भक्ति पहा हो । ते सांगाती झालिया स्वयमेवो । काम क्रोधमोहो न शकती बांधू ।।"

ज्याचा बोध भक्तिमातेच्या संगोपनात वाढला आहे, त्याला कामक्रोधापासून त्रास होणार नाही. याचा अर्थ असा नाही की त्याला कामक्रोध येणार नाहीत. ते प्रारब्धानुसार येतीलच. पण त्यांना तो अज्ञजनांप्रमाणे विकारवश होणार नाही. सुंभ जळल्यावरही त्याचा पीळ दिसतो. परंतु त्याला हात लावला असता हाताला नुसती राखच लागते. सारांश भक्तीच्या योगाने ज्ञान्याला सायासा शिवाय सिद्ध दशा प्राप्त होते :- "श्रवण कीर्तन भक्ती जसी जसी । हरि कृपा अभिवृद्धि तसी तसी ।। जसी कृपा उमजे मधुसूदना । तसी तसी अगुणीं स्थिरता मना ।। जसी जसी स्थिरता हरीची दया । तस तसा अवलोकील तो तया ।। मनी तरंग अहंकृतीचा कसा । मग उठे ? जरी निश्चय हा असा ।। "

आपणच सर्व आहो ही भावना झाल्यावर मी एक ज्ञानी अगर सिद्ध आहे ही कल्पनाच उठणार नाही. अशी स्थिती झाल्यावर ज्याप्रमाणे दुधाचे लोणी केल्यावर ते बिघडण्याची भीती नाही. त्याप्रमाणे चित्त चैतन्य झाल्यावर भक्तीच्या परिपाके करून अंत:करणांत शुद्ध सत्वाची मूर्ती बनल्यावर, त्याला कोणतीच भीती उरणार नाही :- "अभितो ब्रह्म निर्वाणम् ।।"



सद्गुरु नामाचे महत्त्वच असे आहे की त्यायोगे सर्व पातके भस्म होऊन वृत्ति स्वरूपात जाईल म्हणून श्रीनिलोबाराय म्हणतात.

*नित्य सद्गुरुची आळविता नामे । येती निजधामें भेटो सये ।।१।।*

सद्गुरुचे नाम घेतल्याने वैकुंठनायक तेथे सपरिवार येतो.

*सद्गुरु सद्गुरु करितां उच्चार । येती हरिहर भेटो सये ।।२।।*

*सद्गुरुच्या नामें पोट माझे धाय । आनंदाचा होय पाहुणेरु ।।३।।*

*निळा म्हणे माझ्या सद्गुरुची मूर्ती ।*

*सकळां ही विश्रांती विश्रांतीसी ।।४।।*

जगतातील सर्व विश्रांती माझ्या गुरुचरणी विश्रांती घेण्यासाठी येतात. स्वामी विवेकानंद हे अमेरिकेत गेले त्यावेळी काही मित्र मंडळींच्या आग्रहाने My Master ह्या विषयावर बोलण्यास उभे राहिले. भाषणाला सुरुवात करण्यापूर्वी गुरुचे स्मरण केले. कोणतेही कार्य करताना प्रथम मंगलदायक प्रार्थना करतात. शिष्याला सद्गुरुच मंगल आहे कारण -

*"न गुरोरधिकं न गुरोरधिकं शिव शासनत: शिवशासनत:"*

त्याप्रमाणे त्यांनी आपल्या गुरुचें स्मरण केले My Master एवढे दोनच शब्द तोंडातून निघाले त्याबरोबर श्रीरा. परमहंसाची मूर्ती त्यांच्या मन:चक्षूपुढे उभी राहिली व त्यांच्या वृत्तीत एकदम पालट झाला. नेत्रांतून अश्रूंच्या धारा लागल्या. शरीरावर रोमांच उठले सर्व शरीर कंपायमान झाले व कंठवरोध झाल्यामुळे काही बोलता येईना. सर्व सभा हे पाहून तटस्थ झाली. त्यांना वाटले ह्यांना काहीतरी दु:खद वार्ता समजली असेल. विवेकानंदानी बऱ्याचवेळाने भावावस्था आवरली व मग त्या स्थितीत भाषण केले. उत्तमच झाले. आणि विषय गुरुचा घेतला मग काय विचारावे! सर्वजण एकाग्रतेने प्रत्येक शब्द लाख किंमतीचा समजून ऐकत होते. सर्व आटोपल्यावर त्यांच्या काही जीवलग मित्रांनी विचारले की भाषण सर्व उत्तम झाले पण प्रथम तुम्ही काही वेळ स्वस्थ होतात ते तुम्हाला काय

३) *अहा रे सांवळीया कैशी वाजविली मुरली ।।धृ.।।*
*तुझ्या मुरलीची ध्वनी । अकल्पित पडली कानीं ।*
*विव्हळ झालें अंत:करणीं । मी घरधंदा विसरले ।।१।।*

मुरलीचा ध्वनी कानी पडताच अंत:करणात कालवाकालव सुरू झाली असे श्रवणाच्या वेळी झाले पाहिजे. अंत:करण शुद्धीची ही पहिली खूण आहे.

*मुरली नोहे केवळ बाण । तिने हरिला माझा प्राण ।*
*संसार केला दाणादाण । येऊनि हृदयीं संचरली ।।२।।*

जीवदशा नष्ट करणारी ही मुरली आहे.

*तुझ्या मुरलीचा सूरतान । मी विसरलें देहभान ।*
*घर सोडोनी धरिलें रान । मी वृंदावनी गेले ।।३।।*

ध्वनीचा सूर ज्या बाजूने येई त्या बाजूने त्या गोपी जात. गोपींची परीक्षा घेण्यासाठी त्या जेव्हा घरकामी अगदी रंगलेल्या असतात अशावेळी मुरली वाजवित. श्रृतीच त्या! त्यांना त्या मुरलीपुढे कसला प्रपंच! मुरलीचा सूर ऐकताच जशा स्थितीत असत तशाच त्या दिशेला धाव घेत असत. आमच्या सद्भक्ति मंदिरात मध्येच कोणी आले म्हणजे प्रवचन होते. ती बातमी लगेच सर्वांना कळते व सर्व मंडळी आपापली कामे टाकून हजर राहतात.

*एका जनार्दनी गोविंदा । पतितपावन परमानंदा ।*
*तुझ्या नामाचा मज धंदा । वृत्ती तव पदीं निवर्तली ।।४।।*

ह्या पदात श्रीनाथ काय मागतात की सद्गुरुच्या नामाचा मला छंद लागो मग गोपींची वृत्ती जशी लीन होत असे तशी माझी वृत्ती तुझ्या चरणी लीन होईल.

*सद्गुरुचे निजनामाची एक । निवारी बाधा महादेख ।*
*वैराग्य उपजवी अलोलिक । तेणें होय निजसुख साधकां ।। (ए.भा.)*



"राहोऽथवा तनु पडतो समता मनाला । अद्वैत बोध पद निश्चय पूर्ण झाला ।।" अशी ज्याची स्थिती झाली आहे. त्याने ज्ञानाचा बोध दुसऱ्याला केला काय अगर न केला काय, त्याला दोन्ही सारखेच. तरी अधिकारी मुमुक्षु भेटला की त्याला ज्ञानाचा बोध केल्याशिवाय तो राहत नाही.

"जिनके हृदे भगवान बसे । उने औरकु नाम लियो न लियो ।
जिने पाई है मौज अकबर की । उने औरकु दान दियो न दियो ।।"

ज्ञानी भक्ताची अशी स्थिती झाली तरी तो ईश्वराचें नाम घेतोच :- "कवतुक वाटे झालिया वेचावें । नाम मंगलाचें तेणें गुणें ।।" याचे कारण असे आहे की :- "तुका झाला पांडुरंग । त्याचें भजन राहीना । मूळ स्वभाव जाईना ।।"

सारांश सर्व स्थितींत नामच मुख्य साधन आहे. नामाशिवाय कर्माची सांगता होत नाही. ज्ञानाच्या मुळाशीं ही नामच आहे. ज्ञानी सिद्ध झाला तरी तो नाम सोडीत नाही. म्हणून आता आपण ते नामच घेऊ.

"श्री राम जय राम जय जय राम ।।"

**: नारायण :**

# श्री सद्‌गुरु श्री दादाभाईंचे प्रवचन

।। श्री सद्‌गुरुभ्योनमः ।।

**बुधवार : २८.४.४३**
**सकाळी ८.५० ते ९.३०**

१) मुरली वाजविली कृष्णाने, नंदाच्या कान्ह्याने ।। धृ.।।

ही मुरली गोड लागण्यास आपण गोपी झाले पाहिजे. ही देहात्मता सोडून द्या व श्रीकृष्ण भगवान मुरली वाजवतात व आपण गोपी आहोत ह्या भावनेने ती ऐका.

*रात्र झालीसें दोन प्रहर । मधूर मुरली स्वर ।*
*कानी पडताती सुंस्वर । निव्हळ झाले अंतर ।*
*बाई मोहियले मन मोहने । नंदाच्या कान्ह्याने ।।१।।*
*बाई! ऐकागे सखे ऐसी । छळितो हा हृषिकेशी ।*
*घालूनी मुरलीमध्यें मोहिनीसी । वृत्ती केली पाशी ।*
*बाई मोहियले मन मोहने । नंदाच्या कान्ह्याने ।।३।।*

येथे कवि म्हणतो की भगवंताने आम्हाला मोहित केले आहे. हे hypnotism नाही तर काय. अर्थात हे भगवंताचे hypnotism आहे.



मुरलींतून नुसता एक ध्वनी काढून सर्व गोपींचा प्रपंच दाणादाण केला. प्रपंचात राहूच दिले नाही.

आज कृष्णमुखाने न ऐकतां जर एवढा परिणाम होतो तर त्या गोपींवर झाल्यास काय नवल?

*पाहता मुरलीचा स्वर बाई । ऐसा त्रिभुवनी नाही ।*
*चेटकी नाटकी गा अगबाई*
*मोठा शेषशायी गहाण दिधली ग वेदानें, नंदाच्या कान्ह्याने ।।४।।*

इतर पुष्कळ सुंदर वाद्ये आहेत पण ह्या मुरलीच्या ध्वनीत औरच गोडी आहे. ती कानात पडताच प्रपंचाचे विचारच येत नाहीत.

*देव नाथाचे मन नांदे । मोहियले गोविंदे ।*
*लावुनि भजनाच्या निज छंदे । रमवीले स्वानंदे ।*
*वृत्ति झालिसे तल्लीन । नंदाच्या कान्ह्याने ।।५।।*

ही मुरली ऐकल्यावर कोणाला बोलण्याची वृत्ती उठेल? मला तर जेवणखाण काही नको असे वाटते. ब्रह्मरसाने भरलेली मुरली तिने ब्रह्मरस दिल्यावर पोट का भरणार नाही? असो.

*२) भूलविलें वेणूनादें । वेणू वाजविल गोविंदे ।।१।।*

आपण वृंदावनात आहोंत अशी भावना करा.

*पांगुळले यमुनाजळ । पक्षी राहिले निश्चल ।।२।।*

आम्ही तर बोलूनचालून मानवच. पण यमुनाजळ स्थिर झाले. सर्व पक्षी तटस्थ झाले. काय हा अधिकार! एक मुरली वाजवून सर्वांना समाधी दिली.

*तृण चरूं विसरले । पुच्छें पसरोनी राहिले ।।३।।*
*आनंद त्रिभुवनी । एक भुलला जनार्दनीं ।।४।।*

श्री. महाराज म्हणतात श्रीजनार्दन स्वामींच्या मुखानें मी जेव्हा श्रवण करत होतो तेव्हा असेच मला होत असे.

Regd. No. 9023/57

**बुक पोस्ट**

प्रति,

SADBHAKTI PRAKASH


द्वारा
**सद्भक्ति-प्रसारक मंडळी**
श्रीशंकर लॉज, सरस्वतीबाग,
जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-४०००६०.



**शब्दविकास :** विद्या धुमे, विकास प्रिंटर्स, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई : ६०.फोन : २८२४५२७२






(वर्ष ९२) आश्विन ते मार्गशीर्ष शके १९४२ - ऑक्टोबर ते डिसेंबर २०२० (संयुक्तांक १ ते ३)


## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकाचे बोल / वृत्तनिवेदन | १ |
| २) | गुरुवर्य श्री. भाईंचे प्रवचन | ८ |
| ३) | सद्‌गुरु श्री. दादाभाईंचे प्रवचन | २० |
| ४) | उत्सव - महोत्सवांतील कार्यक्रम | २६ |
| ५) | परमप्रिय सद्‌गुरु श्री. भाईंच्या प्रवचनांतील अमृत-कण | ३२ |
| ६) | शोकवृत्त | ३४ |
| ७) | महत्वाच्या सूचना | ३९ |
| ८) | निवेदन | ४० |